# मानक क्र. ९६

**४.७.१ विज्ञान, गणित, तंत्रज्ञान, कला, क्रीडा इत्यादी क्षेत्रातील विविध सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमीतील प्रतिभावान मुलांना शाळा मार्गदर्शन करते.**

**निवडलेला स्तर :** ३

**१.१ प्रतिभावान, हुशार मुले शोधण्यासाठी शाळा विविध प्रणाली/पद्धती/साधने वापरते.**

कनिष्ठ महाविद्यालयात हुशार आणि प्रतिभावान विद्यार्थी ओळखण्यासाठी विविध पद्धती वापरते. यामध्ये प्रश्नमंजूषा परीक्षा, विशेष कार्यक्रम, निबंध स्पर्धा आणि निरीक्षणात्मक मूल्यमापन यांचा समावेश होतो.

प्रश्नमंजूषा परीक्षा विद्यार्थ्यांच्या तर्कशक्ती व ज्ञान तपासतात, तर विशेष कार्यक्रम त्यांची सृजनशीलता विकसित करतात. स्पर्धा वादविवाद, निबंध लेखन, गणितीय आणि विज्ञान स्पर्धाद्वारे विद्यार्थ्यांच्या सखोल विचारक्षमतेला चालना देतात. निरीक्षणात्मक मूल्यमापन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व बौद्धिक वर्तनावर आधारित असते.

या सर्व माध्यमांतून महाविद्यालय विद्यार्थ्यांची गुणवत्ता ओळखून त्यांना योग्य संधी उपलब्ध करून देते, जेणेकरून त्यांचा सर्वांगीण विकास साधता येईल.









**२.१ शाळा विविध वयोगटातील प्रतिभावान, हुशार बालकांसाठी उपलब्ध online साहित्याच्या माध्यमातून विविध अध्ययन पर्याय मिळवून देते.**

महाविद्यालय विविध वयोगटातील प्रतिभावान, हुशार विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध ऑनलाइन साहित्याच्या माध्यमातून विविध अध्ययन पर्याय उपलब्ध करून देते. आमच्याकडे एन-लिस्ट सदस्यता आहे, तसेच अत्याधुनिक संगणक शास्त्र प्रयोगशाळा उपलब्ध आहे. याशिवाय, आमच्याकडे विविध विषयांवरील ई-पुस्तके आहेत आणि आम्ही शक्य तेथे ऑनलाइन अध्यापन करतो, ज्यामुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळू शकते.







**३.१ प्रतिभासंपन्न, हुशार मुले आणि त्यांच्या पालकांसाठी सेमिनारचे आयोजन केले जाते.**

प्रतिभासंपन्न, हुशार मुले आणि त्यांच्या पालकांसाठी आम्ही नियमितपणे सेमिनारचे आयोजन करतो. या सेमिनारद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक, बौद्धिक आणि करिअरविषयक वाटचालीसाठी आवश्यक मार्गदर्शन दिले जाते. तसेच, पालकांना त्यांच्या मुलांच्या प्रतिभेचा योग्य विकास कसा करता येईल याबाबत उपयुक्त माहिती आणि सल्ला दिला जातो. या कार्यक्रमांमध्ये तज्ज्ञ व्याख्याते, शिक्षणतज्ज्ञ आणि उद्योगातील अनुभवी व्यक्ती सहभागी होऊन विद्यार्थ्यांना प्रेरित करतात व त्यांना योग्य दिशेने मार्गदर्शन करतात.






**३.२ पालक, समाज आणि स्वयंसेवी सस्थामार्फत मार्गदर्शन केले जाते.**

पालक समाज आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. काही उल्लेखनीय पदांवर पोहोचलेले आणि विशिष्ट क्षेत्रात अनुभवसंपन्न पालक मार्गदर्शनासाठी सेमिनार घेतात. आपल्या यशस्वी प्रवासातील अडचणी, त्यांचे पालकत्वातील अनुभव, तसेच त्यांनी घेतलेल्या मेहनतीबद्दल ते विद्यार्थ्यांना सांगतात. त्यांच्या अनुभवांतून विद्यार्थ्यांना समजते की कठोर परिश्रम, योग्य नियोजन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यामुळे मोठे यश मिळू शकते. याशिवाय, विविध स्वयंसेवी संस्थांचे (NGO) प्रतिनिधी देखील मार्गदर्शनासाठी उपस्थित राहतात. हे प्रतिनिधी शिक्षण, करिअर, व्यक्तिमत्त्व विकास, शिष्यवृत्ती, तसेच सामाजिक भान जागृत करण्यासंदर्भात महत्त्वपूर्ण माहिती देतात. त्यांच्याद्वारे विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक संधी, रोजगाराच्या संधी आणि सामाजिक जबाबदाऱ्यांबाबत मार्गदर्शन मिळते.

या प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच जीवन कौशल्ये, प्रेरणा आणि आत्मविश्वास मिळतो, जे त्यांना भविष्यातील आव्हाने पेलण्यास मदत करते.





P. B. Mandake.
**PRINCIPAL**
**Indira Mahavidyalaya**
**Kalamb Dist. Yavatmal**